ePaper

काळाचा घाला! उत्तराखंडमध्ये 24 तासांत 5 भीषण अपघात; 17 जणांचा मृत्यू

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

आशा सेविकांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित; भत्त्यात वाढ

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 18 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



राज्यातील आणखी १५ तालुक्यात दुष्काळ!

महाईन्यूज । मुंबई

राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणखी गंभीर होत असून आणखी १५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्याची तयारी सरकारने सुरू केली आहे. पाणीटंचाई निवारण, जलजीवन मिशनची अपूर्ण कामे आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक मंत्रालयात पार पडली.

या बैठकीला राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मत्सव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, जलसंधारण मंत्री संजय राठोड, तसेच वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आदी मंत्रिमंडळातील प्रमुख मंत्री उपस्थित होते. यावेळी चिपळूण, दिंडोशी, वाडा आणि विक्रमगड हे चार तालुके दुष्काळग्रस्त यादीत आले आहेत. तर करवीर, हातकणंगले, गडहिंग्लज आणि कागलसह ११ तालुक्यांचे ग्राऊंड सर्व्हेक्षण करण्याचे आदेश दिले. महसूलमंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

बावनकुळे म्हणाले, ग्राउंड सर्व्हेक्षण आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानुसार चार तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश करण्याबाबतचा विचार आहे. तसेच इतर ९ तालुक्यांच्या मागणीवर नव्याने सखोल सर्वेक्षण करण्याचे आदेश उपसमितीने दिले असून, पुढील बैठकीत त्यावर निर्णय घेतला जाईल. केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार आता 'वीबी-जी राम जी' योजनेअंतर्गत मका आणि ज्वारीच्या लागवडीला मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेतकरी आणि मजुरांना मोठा फायदा होणार असून या पिकांची लागवड मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

जलजीवन मिशनच्या अपूर्ण योजना पूर्ण करून गावे टँकरमुक्त करण्यासाठी ८३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच ज्या गावांचे रेट्रोफिटिंग व ९० टक्के काम पूर्ण झाले आहे, त्यांच्या पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी ४०० कोटी रुपये वितरित केले आहेत. जलसंपदा विभागाच्या मेकॅनिकल डिव्हिजनमधील यंत्रसामग्रीचा वापर करून राज्यातील सर्व जलसंधारण आणि जलसंपदेचे तलाव खोलीकरण करण्याचे निर्देश आजच्या बैठकीत देण्यात आले आहेत.

जलसंपदा विभागाकडे मोठ्या प्रमाणावर यंत्रसामुग्री आहे. या यंत्रसामुग्रीचा वापर स्थानिक पातळीवरील तलाव आणि नाल्यांच्या खोलीकरण व गाळ काढण्यासाठी वापर केला जाणार आहे. मोठ्या प्रमाणावर ही यंत्रणा कार्यरत राहणार असून त्यामुळे दुष्काळाची तीव्रता भविष्यात कमी करण्यासाठी याचा उपयोग होईल. पीकविमा आणि पीकर्जाबाबतही आजच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी राज्यात मुख्यमंत्री दुष्काळ निवारण उपाययोजना राबविण्याबाबत चारा, जनावरे आणि दुष्काळ हटविण्याच्या उपाययोजना याबाबत सादरीकरणही करण्यात आले. पाण्याचे पुनर्भरण, तसेच जलसंधारणासाठी सुमारे ५ हजार कोटींचा आराखडा तयार करण्याचे आदेशही यावेळी बावनकुळे यांनी यावेळी दिले.

आंदोलन-कर्त्याला बैठकीतूनच लावला फोन



राज्यातील दुष्काळाची तीव्रता वाढत असून तालुके दुष्काळी जाहीर व्हावेत यासाठी काही जिल्ह्यांमध्ये आंदोलन सुरु आहे. अशाच प्रकारे गडहिंग्लज तालुका दुष्काळी जाहीर व्हावा यासाठी आंदोलन करण्यात येत आहे. याबाबत वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी लक्ष वेधल्यानंतर दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीतूनच आंदोलकाला फोन लावला. आपल्या तालुक्याचे ग्राऊंड सर्वेक्षण सुरु असून त्यानंतर तालुका दुष्काळी जाहीर होणार किंवा नाही याबाबत निर्णय घेतला जाईल. तोपर्यंत आपण आंदोलन न करता ते थांबवावे अशी विनंती केली. त्यामुळे याबाबत सकारात्मक विचार करु असे आश्वासन आंदोलनकर्त्यांनी दिले. मात्र, बैठकीतून फोन लावल्याने मंत्री दुष्काळाबाबत किती सजग आहेत याचीच चर्चा सुरु राहिली.

पुणेकरांना हुडहुडी; पहाटे थंडीचा कडाका

एनडीएत १०.२ अंश तापमानाची नोंद; पुढील काही दिवस गारठा कायम राहण्याची शक्यता

महाईन्यूज । पुणे

पुणेकरांना यंदा नोव्हेंबरच्या मध्यातच कडाक्याच्या थंडीचा अनुभव येऊ लागला आहे. शहरातील किमान तापमानात सातत्याने घट होत असून, रविवारी (दि. १५) राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) हवामान केंद्रात पारा १०.२ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आला. तर शिवाजीनगर हवामान केंद्रात १२.१ अंश तापमानाची नोंद झाली. हे तापमान सरासरीपेक्षा तब्बल ३.३ अंशांनी कमी असल्याने शहरासह उपनगरांमध्ये पहाटेच्या वेळी गारठा जाणवत आहे.

गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या तापमानात सातत्याने घट होत आहे. दिवसा उन्हाचा चटका जाणवत असला, तरी सूर्यास्तानंतर वातावरणातील उष्णता कमी होत असल्याने रात्री आणि पहाटे थंडीची तीव्रता वाढत आहे. निरभ्र आकाश आणि उत्तरेकडून येणारे थंड व कोरडे वारे यामुळे तापमानात घट होत असल्याचे हवामान निरीक्षणातून दिसून येत आहे. पुढील काही दिवस पुण्यात कोरडे हवामान राहण्याचा अंदाज असून, पहाटेच्या गारठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

१५ नोव्हेंबरच्या नोंदीनुसार, राज्यातील प्रमुख शहरांच्या तुलनेत पुण्यात कमी तापमान होते. शिवाजीनगरमध्ये १२.१ अंश, नाशिकमध्ये १२.६, यवतमाळमध्ये १३, अहिल्यानगरमध्ये १४.३ आणि महाबळेश्वरमध्ये १४.६ अंश तापमानाची नोंद झाली. तर कोल्हापूरमध्ये १७.८, मुंबईतील सांताक्रूझ येथे १९.२ आणि कुलाबा येथे २३.४ अंश तापमान होते. शहरातील पाषाण आणि लोहगाव येथे १५ अंश, तर चिंचवड आणि मगरपट्टा परिसरात १८ अंशांच्या आसपास किमान तापमान नोंदवले गेले. एनडीए परिसरातील मोकळ्या आणि हिरवळीच्या भागात तापमान तुलनेने कमी राहिले.

पुण्यात नोव्हेंबर महिन्यात यापूर्वीही तापमानात मोठी घट झाली आहे. २०२२ मध्ये २१ नोव्हेंबर रोजी शिवाजीनगरमध्ये पारा ८.८ अंशांपर्यंत घसरला होता. नोव्हेंबर २०२४ मध्ये २९ तारखेला ९.५ अंश, तर २०२५ मध्ये १८ नोव्हेंबर रोजी ९.४ अंश तापमानाची नोंद झाली होती. पुण्यात नोव्हेंबर महिन्यातील सर्वकालीन नीचांकी तापमानाची नोंद २७ नोव्हेंबर १९६४ रोजी झाली होती. त्या दिवशी पारा ४.६ अंशांपर्यंत खाली आला होता.

थंडीचा वाढता कडाका लक्षात घेता नागरिकांनी पहाटे आणि रात्री बाहेर पडताना उबदार कपड्यांचा वापर करावा. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनाचा त्रास असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. बंद खोलीत कोळशाची शेगडी किंवा शेकोटी पेटवणे टाळावे.

पाषाण, लोहगाव परिसरातही गारठा

शहरातील विविध हवामान केंद्रांवरील तापमानातही फरक दिसून येत आहे. पाषाण आणि लोहगाव येथे १५ अंश, तर चिंचवड आणि मगरपट्टा परिसरात १८ अंशांच्या आसपास किमान तापमान नोंदवले गेले. एनडीए परिसरातील मोकळ्या आणि हिरवळीच्या भागात तापमान तुलनेने कमी राहिले.



राज्यातील प्रमुख शहरांमध्ये पुणे थंड

१५ नोव्हेंबरच्या तापमान नोंदीनुसार, राज्यातील प्रमुख शहरांच्या तुलनेत पुण्यात कमी तापमानाची नोंद झाली. शिवाजीनगरमध्ये १२.१ अंश, नाशिकमध्ये १२.६, यवतमाळमध्ये १३, अहिल्यानगरमध्ये १४.३ आणि महाबळेश्वरमध्ये १४.६ अंश तापमान होते. तर कोल्हापूरमध्ये १७.८, मुंबईतील सांताक्रूझ येथे १९.२ आणि कुलाबा येथे २३.४ अंश तापमान नोंदवले गेले.

उबदार कपड्यांचा वापर करा

पहाटे आणि रात्री बाहेर पडताना उबदार कपडे, स्वेटर आणि कानटोपीचा वापर करावा. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनाचा त्रास असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. थंड वातावरणात व्यायामासाठी बाहेर पडताना योग्य वेळ निवडावी. तसेच बंद खोलीत कोळशाची शेगडी किंवा शेकोटी पेटवणे टाळावे. त्यामुळे कार्बन मोनॉक्साइडचा धोका निर्माण होऊ शकतो.

एफसी रोडच्या अतिक्रमणावरून भाजप नगरसेवक आक्रमक; सभागृहातच आंदोलन!

महाईन्यूज । पुणे

फर्ग्युसन रस्त्यावरील (एफसी रोड) फेरीवाले आणि अतिक्रमणाच्या प्रश्नावरून पुणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत चांगलाच गदारोळ झाला. विशेष म्हणजे, सत्ताधारी भाजपच्याच नगरसेवकांनी या प्रश्नावरून सभागृहात आंदोलन केले. नगरसेवक सुनील पांडे आणि रवी साळेगावकर यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नाराजी व्यक्त करत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना जाब विचारला. अखेर आयुक्तांनी एफसी रोडवरील अतिक्रमणांवर आजपासूनच कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

फर्ग्युसन रस्त्यावरील फेरीवाल्यांचा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. फेरीवाल्यांमुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालताना अडचणी येत असून, नागरिकांची गैरसोय होत आहे. तसेच काही फेरीवाल्यांकडून तरुणींकडे अश्लील नजरेने पाहणे आणि शेरेबाजी करण्याचे प्रकार घडत असल्याचे आरोपही करण्यात आले आहेत. याबाबत वारंवार तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी नगरसेवकांनी व्यक्त केली.

या प्रश्नावर सुनील पांडे आणि रवी साळेगावकर यांनी थेट सर्वसाधारण सभेत आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले. सत्ताधारी पक्षाचेच नगरसेवक आंदोलनाला बसल्याने सभागृहात राजकीय चर्चेला उधाण आले. एफसी रोडपुरता मर्यादित न राहता शहरातील इतर भागांमधील अतिक्रमणांचाही मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. अतिक्रमणांमुळे नागरिकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी प्रशासनाने ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

नगरसेवकांच्या आंदोलनानंतर आयुक्त नवल किशोर राम यांनी एफसी रोडवरील अतिक्रमणांविरोधात आजपासूनच कारवाई सुरू करण्यात येईल, असे स्पष्ट केले. महापौर मंजुषा नागपुरे यांनीही अधिकाऱ्यांना जाब विचारत अतिक्रमणे हटविण्याचे आदेश दिले. त्यामुळे आता प्रशासन प्रत्यक्षात किती प्रभावी कारवाई करते आणि एफसी रोड अतिक्रमणमुक्त होतो का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



आयुक्तांचे कारवाईचे आश्वासन

एफसी रोडवरील अतिक्रमणाचा प्रश्न सभागृहात गाजल्यानंतर आयुक्त नवल किशोर राम यांनी आजपासूनच कारवाई सुरू करण्याचे आश्वासन दिले. महापौर मंजुषा नागपुरे यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना अतिक्रमणे हटविण्याचे आदेश दिले. त्यामुळे आता प्रत्यक्ष कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सत्ताधारी नगरसेवकांचाच संताप


एफसी रोडवरील अतिक्रमणांवर कारवाई होत नसल्याने भाजपचे नगरसेवक सुनील पांडे आणि रवी साळेगावकर यांनी सभागृहातच आंदोलन केले. सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरल्याने सभेत गदारोळ झाला.

आशा सेविकांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित; भत्त्यात मोठी वाढ

आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यानंतर महापालिकेची मंजुरी

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना दिवाळीनिमित्त ७ हजार ते १५ हजार रुपयांचा प्रोत्साहनपर भत्ता देण्यास महापालिकेने मंजुरी दिली आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी याबाबत दि. २७ ऑक्टोबर रोजी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना पत्र देऊन भत्ता मंजूर करण्याची मागणी केली होती. त्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी महापालिकेचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला. त्यामुळे आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



माता-बाल आरोग्य, लसीकरण, विविध आजारांचे सर्वेक्षण आणि शासकीय आरोग्य योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचविण्यात आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक महत्त्वाची भूमिका बजावतात. विशेषतः झोपडपट्ट्या आणि वंचित वस्त्यांमध्ये आरोग्य यंत्रणा व नागरिक यांच्यातील दुवा म्हणून त्या काम करतात. त्यांच्या कामाची व्याप्ती आणि वाढती महागाई लक्षात घेऊन दिवाळी भत्त्याबाबत प्राधान्याने निर्णय घ्यावा, असे लांडगे यांनी पत्रात नमूद केले होते.

पात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम करणे, आवश्यक आर्थिक तरतूद व प्रशासकीय मान्यता घेणे आणि भत्त्याची रक्कम दिवाळीपूर्वी थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करणे, यासाठी वैद्यकीय व लेखा विभागांना निर्देश द्यावेत, अशी मागणीही लांडगे यांनी केली होती. मागील वर्षी मंजूर भत्त्यापैकी कोणाची रक्कम प्रलंबित असल्यास पडताळणी करून ती तातडीने अदा करावी, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली होती.

किमान भत्त्यात चार हजारांची वाढ

मागील वर्षी पात्र आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांसाठी ३ हजार ते १० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर भत्ता मंजूर करण्यात आला होता. यंदा किमान भत्ता ४ हजार रुपयांनी, तर कमाल भत्ता ५ हजार रुपयांनी वाढविण्यात आला आहे. सप्टेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत किमान सहा महिने (१८० दिवस) काम केलेल्या आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना विहित अटींनुसार हा लाभ मिळणार आहे. महापालिकेच्या ठरावानुसार, २०२५-२६ मध्ये ७५१ आशा स्वयंसेविका कार्यरत होत्या. भत्त्याचा खर्च वैद्यकीय विभागाच्या कुटुंब कल्याणअंतर्गत 'बोनस तथा सानुग्रह अनुदान' या लेखाशिर्षातून करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

> "लसीकरणापासून माता-बाल आरोग्यापर्यंत अनेक सेवा घरोघरी पोहोचवण्याचे काम आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक करतात. त्यांच्या कामाची दखल घेऊन दिवाळीनिमित्त प्रोत्साहनपर भत्ता द्यावा, अशी मागणी मी महापालिका आयुक्तांकडे केली होती. पात्र स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना ७ ते १५ हजार रुपयांचा भत्ता देण्याच्या निर्णयाचे स्वागत करतो. मंजूर रक्कम त्यांच्या बँक खात्यात लवकर जमा व्हावी, यासाठी पाठपुरावा करणार आहे."
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!'; सचिन तापकीर यांच्याकडून गरजूंना मदत

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

चऱ्होली येथील भाजपचे नगरसेवक सचिन तापकीर यांनी सहकाऱ्यांसह खेड तालुक्यातील सुरकुंडी गावाला भेट देऊन गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप केले. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत तापकीर यांनी पुढाकार घेऊन ही मदत गावातील कुटुंबांपर्यंत पोहोचवली.





या वेळी सुरकुंडीचे सरपंच शशिकांत वाजे, उपसरपंच सुनील सुपे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ सरोदे, सामाजिक कार्यकर्ते बाळू घिगे, संकेत वाजे आणि भीमा जाधव, तसेच मारुती भोकटे, सोमनाथ सावंत, योगेश केदारी, विठ्ठल वाजे आणि वाजेवस्तीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि प्रदेश महामंत्री राजेश पांडे यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाला. 'एक नगरसेवक, एक गाव' या संकल्पनेतून खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील ५१ आदिवासी गावांमधील गरजू कुटुंबांना महिनाभर पुरेल असे किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्याचे नियोजन आहे.

> "आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून गरजू कुटुंबांना आधार देण्याचा आम्ही संकल्प केला. त्यातूनच सहकाऱ्यांसह सुरकुंडी आणि माजगाव येथे जाऊन धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंचे किट दिले. या मदतीमुळे कुटुंबांना दैनंदिन खर्चात काहीसा दिलासा मिळेल, अशी आशा आहे."
>
> - सचिन तापकीर, नगरसेवक, भाजपा, चऱ्होली.


माजगावातही गरजू कुटुंबांना मदत

नगरसेवक सचिन तापकीर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खेड तालुक्यातील मौजे माजगाव येथेही भेट दिली. तेथील गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप केले. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू कुटुंबांना आधार देण्याचा संकल्प या मदतकार्यातून माजगावातही कृतीत उतरला.

हरित ऊर्जेला स्थैर्य देणारे नवे तंत्रज्ञान

भूमिका

भारताच्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेला ऊर्जेची मोठी गरज आहे. मात्र, विकासाच्या या प्रवासात पर्यावरणाचे रक्षण आणि प्रदूषणकारी ऊर्जास्रोतांवरील अवलंबित्व कमी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सौर आणि पवन ऊर्जेच्या माध्यमातून स्वच्छ ऊर्जानिर्मितीला चालना मिळत असली, तरी या स्रोतांची मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे.



सूर्यप्रकाश उपलब्ध असेल तेव्हाच सौरऊर्जेची निर्मिती होते, तर पवनऊर्जेचे उत्पादनही वाऱ्याच्या वेगावर अवलंबून असते. त्यामुळे विजेची मागणी सर्वाधिक असताना पुरवठा कसा करायचा, हा प्रश्न निर्माण होतो. यावर प्रभावी उत्तर म्हणून पंप्ड स्टोरेज जलविद्युत प्रकल्पांकडे पाहिले जात आहे. भारताने एकूण ऊर्जेच्या ५० टक्के गरज खनिजेतर स्रोतांमधून भागवण्याचे उद्दिष्ट मुदतीच्या चार वर्षे आधी पूर्ण केले आहे. ही निश्चितच महत्त्वाची कामगिरी आहे. मात्र, केवळ ऊर्जानिर्मिती वाढवून भागणार नाही, तर निर्माण झालेली वीज योग्य वेळी उपलब्ध करून देण्याची व्यवस्थाही सक्षम करावी लागणार आहे. पंप्ड स्टोरेज प्रकल्प याच गरजेची पूर्तता करतात.

अतिरिक्त वीज वापरून खालच्या तलावातील पाणी वरच्या तलावात साठवणे आणि मागणी वाढल्यावर ते पाणी खाली सोडून पुन्हा वीजनिर्मिती करणे, हे या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य आहे. या प्रकल्पांमुळे सौर आणि पवन ऊर्जेचा अधिक प्रभावी वापर शक्य होतो. विजेची मागणी कमी असताना अतिरिक्त ऊर्जा साठवता येते आणि मागणी वाढल्यावर तिचा उपयोग करता येतो. बॅटरी साठवणुकीच्या तुलनेत दीर्घकालीन देखभाल खर्च मर्यादित असणे, पाण्याचा फेरवापर आणि गरजेनुसार वीजनिर्मिती करण्याची क्षमता या बाबी या प्रकल्पांना महत्त्व प्राप्त करून देतात. अर्थात, पंपिंग प्रक्रियेत २० ते ३० टक्के ऊर्जेची हानी होते. तरीही खात्रीशीर वीजपुरवठा आणि वीजजाळ्याची स्थिरता राखण्यासाठी हा पर्याय उपयुक्त ठरतो. महाराष्ट्रासाठी या प्रकल्पांच्या उभारणीची मोठी संधी आहे. राज्यात घाटघर आणि भिरा येथे असे प्रकल्प कार्यान्वित आहेत. याशिवाय ६७.३६ गिगावॉट क्षमतेचे प्रकल्प प्रस्तावित असून, ११ प्रकल्प उभारणी किंवा अंमलबजावणीच्या प्रक्रियेत आहेत. देशभरातील ३२० संभाव्य ठिकाणांमधून ३४५.३८ गिगावॉट वीजनिर्मितीची क्षमता अपेक्षित असणे, या तंत्रज्ञानाचे भविष्यातील महत्त्व अधोरेखित करते. महाराष्ट्राच्या डोंगराळ भौगोलिक रचनेचा यासाठी मोठा फायदा होऊ शकतो.

मात्र, नव्या प्रकल्पांच्या उभारणीची घाई करताना पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांकडे दुर्लक्ष होता कामा नये. जमीन अधिग्रहण, पाण्याची उपलब्धता, पर्यावरणीय परवानग्या, आर्थिक व्यवहार्यता आणि स्थानिक नागरिकांचे हित या बाबींचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. प्रकल्पांच्या मंजुरीपासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता राखली पाहिजे. विकासाच्या नावाखाली स्थानिक पर्यावरण आणि नागरिकांच्या हक्कांवर गदा येणार नाही, याची काळजी घेणे ही शासनाची जबाबदारी आहे.

भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवायचे असेल, तर ऊर्जेची उपलब्धता आणि विश्वासार्हता हे विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ ठरणार आहेत. त्यासाठी स्वच्छ ऊर्जानिर्मितीबरोबरच तिची साठवणूक आणि कार्यक्षम वितरण व्यवस्था उभारावी लागेल. पंप्ड स्टोरेज प्रकल्प या दिशेने आश्वासक पाऊल ठरू शकतात. महाराष्ट्राकडे असलेली भौगोलिक क्षमता राज्याला या क्षेत्रात देशाचे नेतृत्व करण्याची संधी देऊ शकते. मात्र, पर्यावरणाचे रक्षण, जनहित आणि आर्थिक शाश्वतता यांचा समतोल राखूनच या संधीचे प्रत्यक्ष यशात रूपांतर करणे गरजेचे आहे. हरित ऊर्जा निर्माण करण्याबरोबरच ती गरजेच्या वेळी खात्रीने उपलब्ध करून देणे, हेच भविष्यातील ऊर्जा सुरक्षिततेचे खरे सूत्र ठरणार आहे.

प्रासंगिक »

विवेकाचा वेग

एका गावात एक कुंभार राहत होता. तो रोज मातीची सुंदर भांडी बनवत असे. एकदा त्याचा मुलगा घाईघाईने चाकावर माती ठेवून भांडे बनवू लागला. चाकाचा वेग जास्त असल्याने माती विस्कटली आणि भांडे बिघडले.

वडिलांनी त्याला समजावले, "कामात वेग महत्त्वाचा असतो; पण वेगावर नियंत्रण असणे त्याहून महत्त्वाचे असते."

मुलाने पुन्हा प्रयत्न केला. यावेळी त्याने चाकाचा वेग कमी केला, मातीला योग्य आकार दिला आणि सुंदर भांडे तयार केले. त्याला आश्चर्य वाटले की, आधीपेक्षा कमी वेळात नव्हे, तर योग्य पद्धतीने काम केल्यामुळे त्याचे काम अधिक चांगले झाले.

वडील म्हणाले, "आयुष्यात प्रत्येक वेळी पुढे जाण्याची घाई करू नये. कधी थांबणे, विचार करणे आणि परिस्थिती समजून घेणेही आवश्यक असते. कारण चुकीच्या वेगापेक्षा योग्य दिशा अधिक महत्त्वाची असते."

- तात्पर्य : **वेगापेक्षा विवेक आणि संयम महत्त्वाचा असतो. योग्य वेळी घेतलेला निर्णयच यशाचा खरा मार्ग दाखवतो.**

महामार्ग म्हणजे केवळ वेगवान प्रवासाचे साधन नव्हे, तर आर्थिक विकासाला गती देणारी महत्त्वाची पायाभूत सुविधा होय. मात्र, या विकासाचा खरा अर्थ तेव्हाच साध्य होईल, जेव्हा प्रवास वेगवान होण्यासोबत सुरक्षितही असेल.

समृद्धी महामार्गावर वेगाचा कहर; सुरक्षिततेची हमी कधी?



समृद्धी महामार्गावर बुलढाणा जिल्ह्यातील दुसरबीडनजीक १३ नोव्हेंबर रोजी झालेला भीषण साखळी अपघात याच वास्तवाची जाणीव करून देणारा आहे. बल्कर उलटल्याने थांबलेल्या वाहनांना मागून आलेल्या भरधाव कंटेनरने धडक दिली आणि तब्बल २० वाहनांचे नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही; मात्र या घटनेने महामार्गावरील सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी उघड केल्या आहेत.

केवळ रुंद, गुळगुळीत आणि आधुनिक रस्ते उभारून जागतिक दर्जाच्या महामार्गाची निर्मिती होत नाही. त्यासाठी सक्षम वाहतूक व्यवस्थापन, तातडीची मदत, प्रभावी देखरेख आणि वाहनचालकांमध्ये शिस्त असणे आवश्यक आहे. अपघात झाल्यानंतर मागून येणाऱ्या वाहनांना वेळीच सावध करण्यासाठी डिजिटल फलक, लाल शंकू आणि लुकलुकणारे दिवे यांची व्यवस्था असणे गरजेचे आहे. मात्र, समृद्धी महामार्गावरील काही भागांत सीसीटीव्ही आणि डिजिटल सूचना यंत्रणेचा अभाव असल्याचे समोर येणे गंभीर आहे. कंटेनर चालकाने मद्यप्राशन केल्याची प्राथमिक माहितीही वाहन तपासणी आणि नियंत्रण यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. प्रशासनाइतकीच वाहनचालकांची जबाबदारीही महत्त्वाची आहे. महामार्गावर सुरक्षित अंतर राखणे, वाहन बंद पडल्यास त्रिकोणी रिफ्लेक्टर लावणे, आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षा कठड्यापलीकडे थांबणे आणि वेगमर्यादेचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र, या मूलभूत नियमांकडे दुर्लक्ष केले जाते. वाहनचालकांना महामार्गावरील सुरक्षित प्रवासाचे पुरेसे प्रशिक्षण मिळत नसल्याने अपघातांचा धोका वाढतो. वाहन चालवण्याचा परवाना देताना केवळ प्राथमिक चाचणी न घेता महामार्गावरील वाहन हाताळणी आणि आपत्कालीन परिस्थितीचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

दुसरीकडे, अवजड वाहनांची नियमित तपासणी, चालकांच्या विश्रांतीची व्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वाहतुकीवर देखरेख याकडेही लक्ष द्यावे लागेल. महामार्गावर पुरेशी सुविधा केंद्रे, आपत्कालीन मदत पथके आणि कार्यक्षम संपर्क यंत्रणा उपलब्ध असणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित वाहतूक व्यवस्थापनाचा वापरही वाढवायला हवा. समृद्धी महामार्गामुळे प्रवासाचा वेळ कमी झाला, ही समाधानाची बाब आहे. मात्र, वेगाच्या नादात मानवी जीव धोक्यात येत असतील, तर विकासाच्या संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. सरकारने सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करून नियमांची कठोर अंमलबजावणी करावी. नागरिकांनीही रस्ते शिस्तीचे भान ठेवावे. महामार्गांना समृद्धीचा मार्ग बनवायचे असेल, तर वाहनांच्या वेगासोबत चालकांच्या विवेकालाही ब्रेक लावण्याची वेळ आली आहे.

।। अभंगवाणी ।।



काय कशी करिती गंगा ।
भीतरिं चांगा नाहीं तो ॥१॥

अधणीं कुचर बाहेर तैसा ।
नये रसा पाकासि ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

दुष्काळग्रस्तांना मदत की अधिवेशनावर कोट्यवधींची उधळपट्टी?

जनमंचचा सवाल; हिवाळी अधिवेशन मुंबईत घेण्याची मागणी

महाईन्यूज । नागपूर

राज्यात यंदा गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असताना हिवाळी अधिवेशनाच्या आयोजनावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याऐवजी हे अधिवेशन मुंबईतच घ्यावे आणि नागपूर अधिवेशनासाठी होणारा खर्च दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वळवावा, अशी मागणी जनमंच या सामाजिक संस्थेने केली आहे. येत्या ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर संस्थेने ही भूमिका मांडली आहे.

हिवाळी अधिवेशनासाठी मंत्रालयासह विविध विभागांची प्रशासकीय यंत्रणा मुंबईहून नागपुरात हलवावी लागते. मंत्री, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची निवासव्यवस्था, भोजन, वाहतूक, कार्यालयीन सुविधा आणि इतर आनुषंगिक बाबींवर मोठ्या प्रमाणात सरकारी निधी खर्च होतो. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अधिवेशनासाठी सुमारे १२९ कोटी रुपयांचा खर्च दाखविण्यात आला आहे. याशिवाय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रवासभत्ते, दैनिक भत्ते तसेच अन्य खर्चही स्वतंत्रपणे होतात. त्यामुळे प्रत्यक्ष खर्च यापेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे.

राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतीचे नुकसान, पाणीटंचाई आणि आर्थिक विवंचनेमुळे ग्रामीण भागात मदतीची गरज वाढली आहे. अशा परिस्थितीत अधिवेशनाच्या आयोजनावरील खर्च टाळून हा निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी वापरणे अधिक योग्य ठरेल, असे जनमंचचे म्हणणे आहे.

नागपूर करारानुसार राज्याचे एक अधिवेशन नागपुरात घेणे बंधनकारक आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून नागपुरातील अधिवेशनाचा कालावधी दोन आठवड्यांपुरताच मर्यादित राहिला आहे. त्यामुळे अधिवेशनाचा कालावधी, त्यासाठी होणारा खर्च आणि राज्यातील दुष्काळी परिस्थिती यांचा एकत्रित विचार करून निर्णय घ्यावा, अशी मागणी संस्थेने केली आहे. नागपूर अधिवेशनाला किंवा विदर्भाच्या हक्काला विरोध नसून, यंदाची अभूतपूर्व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता अपवादात्मक निर्णय घ्यावा, असे जनमंचचे अध्यक्ष ॲड. मनोहर रडके यांनी स्पष्ट केले.



ग्रामीण भागात मदतीची अधिक गरज

राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतीचे नुकसान, पाणीटंचाई आणि आर्थिक विवंचनेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना तातडीच्या मदतीची गरज आहे. अशा परिस्थितीत अधिवेशनाच्या व्यवस्थेवर होणारा अतिरिक्त खर्च टाळून तो निधी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी वापरणे अधिक योग्य ठरेल, असे जनमंचचे म्हणणे आहे. एका बाजूला दुष्काळग्रस्तांसाठी मदतीचे नियोजन सुरू असताना दुसऱ्या बाजूला अधिवेशनाच्या व्यवस्थेवर कोट्यवधी रुपये खर्च होणे, ही विसंगती असल्याचे संस्थेने म्हटले आहे.

अधिवेशनाला विरोध नाही

नागपूर करारानुसार राज्याचे एक अधिवेशन नागपुरात घेणे बंधनकारक आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून नागपुरातील अधिवेशनाचा कालावधी केवळ दोन आठवड्यांपुरता मर्यादित राहिला आहे. अधिवेशनाचा कालावधी, त्यासाठी होणारा प्रचंड खर्च आणि राज्यातील सध्याची दुष्काळी परिस्थिती या सर्व बाबींचा विचार करून निर्णय घ्यावा, अशी मागणी जनमंचने केली आहे.

वेतनवाढीचा प्रश्न पेटला; न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा इशारा

महाईन्यूज ।
छत्रपती संभाजीनगर

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मंगळवारपासून (दि. १७) बेमुदत संप पुकारला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव उच्च न्यायालयाने राज्य शासनाकडे पाठवूनही अद्याप निर्णय झालेला नाही. वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून दखल घेतली जात नसल्याने संपाचा निर्णय घेण्यात आल्याचे कर्मचारी संघटनांनी स्पष्ट केले आहे. शासन निर्णय जारी झाल्याशिवाय संप मागे घेणार नसल्याची ठाम भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे.

उच्च न्यायालय आणि दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांचे वेतन २००६ पर्यंत समान होते. मात्र, २०२३ मध्ये उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयासह नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठातील कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ मिळाला. त्याच धर्तीवर दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू होणे अपेक्षित होते. मात्र, शासनाने याबाबत निर्णय न घेतल्याने दोन्ही संवर्गांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनात तफावत निर्माण झाली आहे.

दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीसंदर्भात उच्च न्यायालयाने न्यायमूर्तींची समिती गठित केली होती. या समितीच्या शिफारशीनुसार ३१ जानेवारी २०२५ रोजी सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला. मात्र, त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ, गट-क कर्मचारी, लघुलेखक, बेलीफ, वाहनचालक आणि चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनांनी एकत्रितपणे संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विजयकुमार दांडगे, सचिव मोहम्मद रियाजोद्दीन गाझी आणि मार्गदर्शक बाळासाहेब चव्हाण यांच्यासह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांची भूमिका स्पष्ट केली. 'आधी जीआर, मगच माघार' असा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

या संपात राज्यातील सुमारे पाच हजार सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारीही सहभागी होणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण करून शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे. सुधारित वेतनश्रेणीचा शासन निर्णय जारी होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशाराही कर्मचारी संघटनांनी दिला आहे.

वेतनवाढीची प्रतीक्षा

२०२३ मध्ये उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली. मात्र, त्याच धर्तीवर दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना अद्याप या लाभापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे दोन्ही संवर्गांतील वेतनात तफावत निर्माण झाली आहे. ही तफावत दूर करून दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी कर्मचारी संघटनांकडून सातत्याने केली जात आहे.



निवृत्त कर्मचाऱ्यांचाही सहभाग

सुधारित वेतनश्रेणीच्या मागणीसाठी सुरू करण्यात आलेल्या या आंदोलनात राज्यातील सुमारे पाच हजार सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारीही सहभागी होणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण करून शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे. शासनाने प्रलंबित मागणीवर तातडीने निर्णय घेऊन सुधारित वेतनश्रेणीचा जीआर काढावा, अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून केली जात आहे.

उत्तराखंडमध्ये भीषण बस अपघात!

पुलावरून बस थेट १०० मीटर दरीत कोसळली; आठ जणांचा मृत्यू, २६ प्रवासी जखमी

महाईन्यूज । उत्तराखंड

उत्तराखंडमध्ये हृषिकेश-बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी सकाळी भीषण बस अपघात झाला. गुलजार बाजार परिसरातील पुलावरून एक बस जवळपास १०० मीटर खोल दरीत कोसळून नाल्यात पडली. या दुर्घटनेत आठ प्रवाशांचा मृत्यू झाला असून, २६ जण जखमी झाले आहेत. जखमींना हृषिकेशमधील एम्ससह विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे.



पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, विश्वनाथ सेवा संस्थेची ही बस हरिद्वारहून कर्णप्रयागच्या दिशेने जात होती. बसमध्ये एकूण ३४ प्रवासी होते. मंगळवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास बस हरिद्वारहून निघाली होती. त्यानंतर साधारण तासाभरात गुलर बाजाराजवळ हा अपघात झाला. बस पुलावरून खाली कोसळल्यानंतर सात प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला; तर गंभीर जखमी झालेल्या एका प्रवाशाचा हृषिकेश येथील एम्स रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघात नेमका कशामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

अपघाताची माहिती मिळताच ब्यासी आणि ढालवाला येथे तैनात असलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. दरीत कोसळलेल्या बसमधील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले. अपघाताची तीव्रता लक्षात घेऊन कमांडंट अर्पण यदुवंशी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त पथकेही घटनास्थळी पाठवण्यात आली.

जखमी २६ प्रवाशांना बाहेर काढून हृषिकेशमधील विविध रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी बृजेश भट्ट यांनी अपघाताला दुजोरा दिला असून बचावकार्य सुरू असल्याचे सांगितले.

प्रशासनाने जखमी प्रवाशांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यामध्ये झारखंड, बिहार, उत्तराखंड, आसाम, दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश व पश्चिम बंगालमधील प्रवाशांचा समावेश आहे. झारखंडमधील दुमका, बिहारमधील पाटणा व जहानाबाद, आसाममधील गुवाहाटी तसेच पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील प्रवासी जखमी झाले आहेत.

उत्तराखंडमधील हल्द्वानी, रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, जसपूर, खटीमा व पिथौरागढ येथील प्रवाशांचाही जखमींमध्ये समावेश आहे. जखमींमध्ये गुवाहाटी येथील तीन वर्षांच्या मुलीचा आणि हल्द्वानी येथील ६४ वर्षीय महिलेचाही समावेश आहे. एका प्रवाशाची ओळख अद्याप पटलेली नसून, त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून मृतांना श्रद्धांजली!

दरम्यान, उत्तराखंडच्या टिहरी गढवाल जिल्ह्यात झालेल्या या बस अपघातातील जीवितहानीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केले असून मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर पोस्ट करत त्यांनी म्हटले आहे की, "या दुर्दैवी घटनेने मन व्यथित झाले आहे. अपघातात जखमी झालेल्यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, अशी मी प्रार्थना करतो."

अरविंद केजरीवालांचा 'शीशमहल' आता जनतेसाठी खुला होणार!

महाईन्यूज । नवी दिल्ली

आम आदमी पक्षाचे मुख्य समन्वयक व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचं कधीकाळी ज्या बंगल्यात वास्तव्य होतं व ज्या बंगल्याला भारतीय जनता पक्षाने खोचक भाषेत 'शीशमहल' म्हटलं होतं, तो बंगला आता जनतेला बघण्यासाठी खुला होणार आहे. दिल्लीतील भारतीय जनता पक्षाच्या सरकारने यासंदर्भातला निर्णय जाहीर केला आहे. येत्या एक ते दोन आठवड्यांमध्ये हा बंगला आतून बघण्यासाठी खुला होणार असून त्यासाठी तिकीट कसे बुक केले जातील? वेळ काय असेल? अशा अनेक गोष्टींची माहिती येत्या काही दिवसांत जाहीर केली जाईल, असं दिल्लीचे सार्वजनिक बांधकाम मंत्री परवेश वर्मा यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं आहे.



अरविंद केजरीवाल यांचा बंगला आधी शासकीय विश्रामगृह म्हणून वापरण्यात येणार होता. मात्र, आता दिल्ली सरकारने आपला निर्णय बदलला आहे. त्यामुळे जनतेला पाहाण्यासाठी हा बंगला खुला करण्यात येणार आहे. "आम्ही आधी शीश महल राज्य विश्रामगृह म्हणून रुपांतरीत केलं जाईल असं म्हणालो होतो. पण आता दिल्लीच्या जनतेची मागणी पाहता हा निर्णय घेतला गेला आहे की शीशमहल जनतेसाठी खुला केला जाईल. पुढच्या आठवड्यापासून दिल्लीची जनता तिकीट बुक करू शकेल. त्यासंदर्भात कशी व्यवस्था असेल, ते लवकरच जाहीर केलं जाईल", असं परवेश वर्मा म्हणाले.

"शीश महल बघण्याची सगळ्या पहिली संधी माध्यमांना दिली जाईल. त्यात हे दाखवलं जाईल, की कशा प्रकारे जी व्यक्ती असं म्हणत होती की मी गाडी-बंगला घेणार नाही, त्या व्यक्तीने आधी अनेक बंगले तोडले. अनेक सर्व्हंट क्वॉर्टर तोडले. त्यानंतर तिथे शीशमहल बनवला. त्याची एकच खोली दाखवली जायची जिथे अनिच्छेनंच भगत सिंग व बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो लावले होते. तीच खोली देशाच्या जनतेला फोटोंच्या माध्यमातून दाखवली जात होती. बंगल्याच्या इतर भागात जाण्याची कुणालाही परवानही नव्हती", असंही परवेश वर्मा म्हणाले.

दरम्यान, यावेळी बंगल्यातील काही बाबींचा परवेश वर्मा यांनी उल्लेख केला. "त्या बंगल्यात प्रत्येक खोलीत स्मार्ट लाईट लावण्यात आल्या आहेत, ज्या रिमोटवर रंग बदलातात. तिथे करोडो रुपयांचे पडदे लावले आहेत. व्हिएतनामहून मागवलेले मार्बल लावले आहेत. आता आम्ही जनतेला तो शीशमहल आतमधून दाखवू", असं परवेश वर्मा पत्रकार परिषदेत म्हणाले.

का आहे 'शीशमहल' वादग्रस्त?

अरविंद केजरीवाल मुख्यमंत्री असताना या बंगल्यात वास्तव्यास होते. त्यांच्यावर टीका करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने या बंगल्याला 'शीशमहल' असं नाव दिलं आहे. २०२५ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकांदरम्यान हा बंगला विशेष चर्चेत आला तो भाजपाच्या टीकेमुळे. २०१५ ते २०२५ अशी जवळपास १० वर्षं अरविंद केजरीवाल व त्यांचे कुटुंब या बंगल्यात वास्तव्यास होते. याच बंगल्याची आधी डागडुजी व नंतर पुनर्बांधणीसाठी अरविंद केजरीवाल यांनी मोठ्या प्रमाणावर खर्च केला, बंगल्यात अनेक आलिशान सोयी-सुविधा करून घेतल्या असा आरोप भाजपानं केला. कॅगनं यासंदर्भात दिलेल्या अहवालात बंगल्याच्या डागडुजीचा खर्च ३३.६६ कोटी रुपये इतका नमूद केला. यापैकी १८.८८ कोटी रुपये बंगल्यातील शोभेच्या गोष्टींवरच खर्च करण्यात आल्याचंही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.



'रामायण'ने बॉक्स ऑफिस गाजवलं!

दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या बहुचर्चित रामायण: राइज ऑफ अ लेजेंड या चित्रपटाने प्रदर्शनाच्या अवघ्या ११ दिवसांत जागतिक बॉक्स ऑफिसवर १४७.५ दशलक्ष डॉलर्स (सुमारे १,३८६.५ कोटी रुपये) कमावले आहेत. चित्रपटाचे जागतिक वितरक सोनी पिक्चर्सने मंगळवारी ही अधिकृत माहिती दिली. या दमदार कामगिरीसह हा चित्रपट आतापर्यंतचा पाचवा सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट ठरला आहे.

रणबीर कपूरची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाने पहिल्या वीकेंडला जगभरात ५५.७ दशलक्ष डॉलर्स (५२३.६ कोटी रुपये) कमावले होते. दुसऱ्या वीकेंडला या चित्रपटाने ३८.१ दशलक्ष डॉलर्स (३५८.१ कोटी रुपये) गल्ला जमवला, जो पहिल्या वीकेंडच्या तुलनेत केवळ ३४ टक्क्यांनी कमी आहे.

आठवड्याच्या मधल्या दिवसांतील भक्कम कमाई, प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि समीक्षकांच्या कौतुकामुळे चित्रपटाची घोडदौड सुरूच आहे.

भारताबाहेर या चित्रपटाचे वितरण सांभाळणाऱ्या सोनी पिक्चर्सने सुरुवातीच्या ३७ बाजारपेठांवरून आता ४३ देशांमध्ये चित्रपटाचा विस्तार केला आहे. गेल्या आठवड्यात सहा नवीन देशांमध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला.

हा चित्रपट १९ नोव्हेंबर रोजी ब्राझील, इटली, युक्रेन आणि हंगेरीमध्ये प्रदर्शित होणार असून २० नोव्हेंबरला पोलंडमध्ये दाखल होईल. त्यानंतर २६ नोव्हेंबरपासून अर्जेंटिना, मध्य अमेरिका, कोलंबिया, इक्वेडोर, पेरू आणि झेकियामध्ये चित्रपट प्रदर्शित केला जाईल. तसेच चीन, जपान आणि दक्षिण कोरियामध्येही चित्रपट प्रदर्शित करण्याची तयारी सुरू असून, त्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. १३० हून अधिक देशांमध्ये आणि १७ डब भाषांमध्ये हा चित्रपट पोहोचवण्याचे निर्मात्यांचे उद्दिष्ट आहे.



क्रितीची पोस्ट चर्चेत!

बॉलिवूड अभिनेता वऊण धवन, अभिनेत्री क्रिती सेनॉन आणि दिग्दर्शक अमर कौशिक हे त्रिकूट पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. 2022 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'भेडिया' चित्रपटात एकत्र काम केलेल्या या तिघांनी नुकताच एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्यामुळे 'भेडिया 2'च्या माध्यमातून ही जोडी पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार का, असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. क्रिती सेनॉनने सोशल मीडियावर वऊण धवन आणि अमर कौशिक यांच्यासोबतचा एक व्हिडीओ शेअर केला. वऊणनेही हा व्हिडीओ पुन्हा पोस्ट केला. मात्र, या भेटीमागील नेमके कारण तिघांनीही स्पष्ट केलेले नाही.

'भेडिया' हा हॉरर-कॉमेडी प्रकारातील चित्रपट नोव्हेंबर 2022 मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात वऊण धवनने भास्कर नावाच्या रस्तेबांधणी ठेकेदाराची भूमिका साकारली होती. अऊणाचल प्रदेशातील जंगलात काम करत असताना एका लांडग्याने त्याला चावा घेतल्यानंतर त्याच्यात विचित्र बदल घडू लागतात. भास्कर हळूहळू वेअरवुल्फ म्हणजेच लांडग्यासारख्या प्राण्यात रूपांतरित होऊ लागतो. या रहस्यमय बदलांमुळे त्याच्या आयुष्यात अनेक अनपेक्षित घटना घडतात. क्रिती सेनॉनने या चित्रपटात अनिका या पशुवैद्यकीय डॉक्टरची भूमिका साकारली होती. भास्करच्या बाबतीत घडणाऱ्या रहस्यमय घटनांची तिला सुऊवातीला दिसते त्यापेक्षा अधिक माहिती असल्याचे कथानकातून उलगडते.



साई पल्लवीचा नवा लुक चर्चेत!

नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' चित्रपटात दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री साई पल्लवी सीतेच्या भूमिकेत झळकली आहे. तिच्या अभिनयाची प्रेक्षकांकडून प्रशंसा होत आहे. अशातच तिच्या आगामी 'ओम' चित्रपटातील लुकची जोरदार चर्चा रंगली आहे. या चित्रपटातील भूमिकेसाठी साई पल्लवीने चक्क आपले केस कापले असून, ही गोष्ट तिच्या आई वडिलांना समजल्यानंतर काय घडलं होतं याविषयीचा एक किस्सा तिने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सांगितला. कलाकारांना एखाद्या भूमिकेला योग्य न्याय देण्यासाठी अनेकदा आपल्या लुकमध्ये मोठे बदल करावे लागतात. साई पल्लवीनेही 'ओम' चित्रपटातील आपल्या भूमिकेसाठी केस कापण्याचा धाडसी निर्णय घेतला. ती या चित्रपटात एका महिला पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे.

MS धोनीचा IPL ला अलविदा!

खेळाडू म्हणून नवी इनिंग थांबणार; CSK च्या मेंटॉरपदाची धुरा सांभाळणार



महाईन्यूज । नवी दिल्ली

क्रिकेटच्या मैदानावर कर्णधार म्हणून अनेकदा संघाला विजय मिळवून देणारा, आपल्या नेतृत्वाने प्रतिस्पर्ध्यांना चितपट करणारा आणि कोट्यवधी चाहत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा महेंद्रसिंह धोनीने आयपीएलला अलविदा केलं आहे. ज्या धोनीला मैदानावर फलंदाजी करताना पाहण्यासाठी चाहते आतुरतेने वाट पाहत असतात, तो धोनी आता मैदानावर फलंदाजी करताना दिसणार नाही. चेन्नई सुपर किंग्सने अधिकृत घोषणा करत धोनीचा खेळाडू म्हणून आयपीएलमधील प्रवास संपल्याचं सांगितलं आहे आणि याचबरोबर संघात त्याला मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.

धोनीच्या आयपीएल निवृत्तीबाबत CSK संघाचे मालक काय म्हणाले?

चेन्नई सुपर किंग्सचे मालक एन. श्रीनिवासन यांनी महेंद्रसिंह धोनीचं फ्रँचायझीसाठी असलेलं महत्त्व अधोरेखित केलं. ते म्हणाले, "महेंद्रसिंह धोनीशिवाय चेन्नई सुपर किंग्सची कल्पनाच करता येणार नाही. जवळपास दोन दशकांपासून आम्ही एकत्र प्रवास करत आहोत. या काळात अनेक विजय, पराभव आणि कठीण प्रसंगांचा सामना केला आहे. आमच्यातील नातं आजही इतकं मजबूत असण्यामागचं एकच कारण आहे, ते म्हणजे आम्ही एकमेकांच्या हेतूंवर कधीही शंका घेतली नाही. आमच्यातील विश्वासामुळेच हा प्रवास शक्य झाला. २००८ मध्ये धोनी चेन्नई सुपर किंग्सचा भाग असलाच पाहिजे, असा माझा आग्रह होता. मागे वळून पाहताना तो माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम निर्णय ठरल्याचं जाणवतं. केवळ फ्रँचायझीसाठी त्याने मिळवलेल्या यशामुळे नव्हे, तर तो माणूस म्हणून कसा आहे, यामुळेही हा निर्णय महत्त्वाचा ठरला. धोनी नेहमीच चेन्नई सुपर किंग्स संघाची ओळख असेल आणि चेन्नई हे कायम त्याचं घर असेल," असं श्रीनिवासन यांनी सांगितलं.

कॅप्टन कूल एम एस धोनी आता नव्या भूमिकेत दिसणार आहे. आयपीएलमधील चेन्नई सुपर किंग्सचा चेहरा बनलेल्या धोनीकडे आता संघाच्या मेंटॉरपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ज्या संघाला त्याने आपल्या नेतृत्वाखाली पाच वेळा आयपीएलचं विजेतेपद मिळवून दिलं, त्याच संघाला आता तो मार्गदर्शन करताना दिसणार आहे. त्यामुळे धोनी आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यातील नात्याचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे.

चेन्नई सुपर किंग्सने महेंद्रसिंह धोनीबाबत अधिकृत घोषणा केली आहे. धोनी आता संघाच्या मेंटॉरपदाची जबाबदारी सांभाळणार आहे. याबाबत पोस्ट शेअर करत सीएसकेने म्हटलं की, "धोनीसारखा खेळाडू पुन्हा होणं शक्य नाही. त्याची नवी भूमिका असली तरी संघाबरोबरचं त्याचं नातं कायमचं आहे. असंख्य विजय, कठीण प्रसंग आणि अविस्मरणीय आठवणींच्या प्रवासात धोनी सुरुवातीपासूनच चेन्नई सुपर किंग्सच्या केंद्रस्थानी राहिला आहे."

"संघाला यशाच्या शिखरावर पोहोचवण्यापासून ते आता नव्या पिढीतील खेळाडूंना मार्गदर्शन करण्यापर्यंत धोनीची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. 'थाला' नेहमीच चेन्नई सुपर किंग्सच्या ओळखीचा अविभाज्य भाग असेल आणि चेन्नई हे कायमच त्याचं घर राहील," अशा शब्दांत फ्रँचायझीने धोनीप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या.

सनरायझर्सचा धडाकेबाज ओपनर आयपीएलमधून बाहेर!

महाईन्यूज । हैदराबाद

आयपीएलच्या नव्या हंगामासाठी रिटेन्शन आणि ट्रेडऑफचा बाजार तेजीत आहे. यादरम्यान ऑस्ट्रेलियाचा धडाकेबाज सलामीवीर आणि अष्टपैलू खेळाडू ट्रॅव्हिस हेडने पुढच्या आयपीएल हंगामातून माघार घेतली आहे. ट्रॅव्हिस आणि अभिषेक शर्मा जोडीने सनरायझर्सला सातत्याने तडाखेबंद सलामी मिळवून दिली होती. या दोघांनी प्रतिस्पर्धी संघांच्या गोलंदाजी आक्रमणाला निष्प्रभ केलं होतं. या जोडीला ट्रॅव्हिशेक हे टोपणनाव मिळालं होतं.



ऑस्ट्रेलियासाठी सातत्याने खेळत असल्यामुळे वर्कलोड मॅनेजमेंटचा विचार करून ट्रॅव्हिसने आयपीएल २०२७ मधून माघार घेतली आहे. ऑस्ट्रेलियाचा संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल खेळण्याची शक्यता आहे. आयपीएलनंतर लगेचच हा सामना असणार आहे. त्यानंतर ॲशेस मालिका होणार आहे. त्यानंतर वनडे वर्ल्डकप होणार आहे. एकामागोमाग एक सातत्याने स्पर्धा होणार असल्याने ट्रॅव्हिसने आयपीएलऐवजी ऑस्ट्रेलियासाठी खेळण्याला प्राधान्य दिलं आहे.

ट्रॅव्हिसला सनरायझर्सने १४ कोटी रुपये खर्चून रिटेन केलं होतं. ट्रॅव्हिससह सनरायझर्सने हेनरिच क्लासन, पॅट कमिन्स, अभिषेक शर्मा आणि नितीश कुमार रेड्डी यांना रिटेन केलं होतं. २०२४ मध्ये झालेल्या लिलावात सनरायझर्सने ट्रॅव्हिसला ६.८ कोटी रुपये मोजून ताफ्यात घेतलं होतं. त्याआधीच्या वर्षी झालेल्या लिलावात ट्रॅव्हिस अनसोल्ड गेला होता. मात्र सनराझझर्सने त्याच्यावर विश्वास ठेवला. ट्रॅव्हिसने संघव्यवस्थापनाचा विश्वास सार्थ ठरवत १९१च्या स्ट्राईकरेटने ५६७ धावा केल्या होत्या. ट्रॅव्हिस-अभिषेक जोडीच्या दमदार कामगिरीच्या बळावर सनरायझर्सने अंतिम फेरीत धडक मारली होती.

याधी ट्रॅव्हिस रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघासाठी खेळला आहे. सनरायझर्सशी खेळताना ट्रॅव्हिसने ४३ सामन्यात १७६च्या स्ट्राईकरेटने १३५१ धावा केल्या आहेत. पॉवरप्लेच्या षटकात ट्रॅव्हिषेक जोडीने प्रतिस्पर्धी गोलंदाजांच्या ठिकऱ्या उडवल्या होत्या. ट्रॅव्हिसच्या अनुपस्थितीत इशान किशन अभिषेक शर्माच्या बरोबरीने सलामीला येण्याची शक्यता आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। बुधवार ।
दि. 18 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

पुणे जिल्ह्यातील स्थानिक कबड्डीपटूंना ‘धर्मवीर लीग’चे व्यासपीठ!


भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आयोजन

संलग्न संघांना प्रत्येकी १० खेळाडूंची नोंदणी करता येणार

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

पुणे जिल्ह्यातील स्थानिक कबड्डीपटूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून ‘धर्मवीर कबड्डी प्रीमियर लीग २०२६’ आयोजित करण्यात येत आहे. पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनतर्फे ही लीग आयोजित केली जात असून, खेळाडूंच्या नावनोंदणीसाठी संयोजन समितीने सूचना जारी केल्या आहेत.







चाचणीत पात्र ठरलेल्या खेळाडूंची लिलावातून निवड

निवड चाचणीत पात्र ठरणाऱ्या खेळाडूंची लीगसाठी निवड लिलाव पद्धतीने केली जाणार आहे. लीगमधील सामन्यांचे थेट प्रक्षेपण करण्याचेही नियोजन असल्याचे आयोजकांनी पत्रकात नमूद केले आहे. शनिवार, २१ आणि रविवार, २२ नोव्हेंबर २०२६ या तारखा दिल्या आहेत. तसेच कै. मारुती रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल, बापुजी चौक, भोसरी हे स्थळ नमूद आहे. नोंदणी सूचनेच्या मुख्य मजकुरात निवड चाचणीची तारीख स्वतंत्रपणे जाहीर केली जाईल, असे म्हटले आहे. त्यामुळे चाचणीसाठी उपस्थित राहण्यापूर्वी संघांनी अंतिम तारीख आणि सत्राची वेळ संयोजन समितीकडून जाणून घ्यावी. तसेच, पुणे जिल्ह्यातील कबड्डीपटूंच्या नावनोंदणीसाठी सुनील लांडे- 9764351551 आणि मच्छिंद्र लांडगे- 9834418030 यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन केले आहे.



स्थानिक मैदानांवर खेळणाऱ्या नवोदित आणि गुणवंत खेळाडूंना स्पर्धात्मक कबड्डीत पुढे जाण्याची संधी मिळावी, हा लीगचा उद्देश आहे. पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनशी संलग्न प्रत्येक संघाला आपल्या संघातील १८ वर्षांवरील जास्तीत जास्त १० खेळाडूंची नावनोंदणी करता येणार आहे.

संघ व्यवस्थापकांनी प्रत्येक खेळाडूचा विहित नमुन्यातील स्वतंत्र अर्ज भरावा. अर्जासोबत खेळाडूचा फोटो, त्याची स्वाक्षरी आणि संघाची अधिकृत शिफारस आवश्यक आहे. नोंदणीसाठी सुचविलेल्या खेळाडूंची नावे संस्थेच्या अधिकृत लेटरहेडवर नमूद करून त्यावर अध्यक्ष किंवा सचिवांची स्वाक्षरी घ्यावी. स्वतंत्र अर्ज आणि स्वाक्षरीयुक्त यादी संयोजन समितीकडे सादर करावी, असे सूचनेत नमूद आहे.

> “प्रत्येक खेळाडूसाठी स्वतंत्र अर्ज भरावा. खेळाडूंची यादी संस्थेच्या अधिकृत लेटरहेडवर तयार करून त्यावर अध्यक्ष किंवा सचिवांची स्वाक्षरी घ्यावी. अर्ज आणि यादी संयोजन समितीकडे सादर करावी. नोंदणी, अर्ज किंवा निवड चाचणीबाबत काही शंका असल्यास संघांनी दिलेल्या क्रमांकांवर संपर्क साधावा.”
> - मच्छिंद्र लांडगे, **समन्वयक, धर्मवीर कबड्डी लीग.**

> “पुणे जिल्ह्यातील स्थानिक कबड्डीपटूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, हा ‘धर्मवीर कबड्डी प्रीमियर लीग’चा उद्देश आहे. पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनशी संलग्न संघांनी आपल्या संघातील १८ वर्षांवरील जास्तीत जास्त १० खेळाडूंची नावनोंदणी करावी. नवोदित खेळाडूंना या संधीचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापकांनी पुढाकार घ्यावा.”
> - सुनील लांडे, **समन्वयक, धर्मवीर कबड्डी लीग.**

पुनर्वापरातून साधला सौंदर्याचा नवा आविष्कार

फुलेनगरमध्ये टाकाऊ वस्तूंच्या कलात्मक वापरातून परिसराचे सुशोभीकरण

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

वारंवार कचरा साठणारी ठिकाणे (गार्बेज व्हल्नरेबल पॉइंट – GVP) स्वच्छ, सुंदर आणि आकर्षक बनविण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विविध अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहेत.



याच उपक्रमांतर्गत 'ल' क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक २० मधील डी. वाय. पाटील लॉ कॉलेज, फुलेनगर येथील वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणाचे टाकाऊ वस्तूंच्या कल्पक आणि कलात्मक पुनर्वापरातून आकर्षक स्थळात रूपांतर करण्यात आले आहे. कल्पकतेचा स्पर्श आणि सौंदर्यदृष्टीची जोड देत निरुपयोगी वस्तूंना नवे रूप बहाल करण्यात आले असून, कचऱ्याच्या जागी सौंदर्याची नवी निर्मिती साकारली आहे. या अभिनव उपक्रमातून परिसराचे रूपडे पालटण्यासोबतच पुनर्वापराचे महत्त्व आणि स्वच्छतेचा संदेशही त्यानिमित्ताने देण्यात येत आहे.

यापरिसरात यापूर्वी कचरा टाकला जात असलेल्या ठिकाणी विविध टाकाऊ वस्तूंचा सुबक आणि कलात्मक पद्धतीने वापर करण्यात आला. त्यामुळे केवळ परिसराचे सौंदर्यीकरण झाले नाही, तर कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, पुनर्वापर आणि सार्वजनिक स्वच्छतेविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होण्यासही मदत होणार आहे. कचरा टाकण्याच्या ठिकाणाचे सुशोभीकरण करून त्याचे सकारात्मक आणि आकर्षक जागेत रूपांतर करण्याचा हा उपक्रम विशेष ठरत आहे.

यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगरसदस्या वर्षा जगताप, आरोग्य निरीक्षक लक्ष्मण साळवे तसेच महापालिकेचे अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. टाकाऊ वस्तूंमधून साकारलेले हे सौंदर्यपूर्ण परिवर्तन शहरातील स्वच्छता मोहिमेला नवी दिशा देणारे ठरत आहे.

> वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणांचे कायमस्वरूपी स्वरूपात रूपांतर करण्यासाठी केवळ स्वच्छता पुरेशी नाही, तर त्या ठिकाणांचा सकारात्मक वापर आणि सौंदर्यीकरणही महत्त्वाचे आहे. टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून अशा जागांचे आकर्षक रूपांतर केल्यास नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जाणीव निर्माण होईल. शहरातील इतर वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणी अशा नावीन्यपूर्ण संकल्पना राबविण्यावर भर देण्यात येत आहे.
>
> 
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवणे ही केवळ महापालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचेही कर्तव्य आहे. टाकाऊ वस्तूंचा कलात्मक पुनर्वापर करून वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणांचे सुशोभीकरण करणे हा पर्यावरणपूरक आणि अभिनव उपक्रम आहे. अशा उपक्रमांमुळे स्वच्छतेसोबतच पुनर्वापराची संस्कृती विकसित होण्यास मदत होईल.
>
> 
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणांवर पुन्हा कचरा साचू नये, यासाठी परिसराचे सुशोभीकरण, नियमित स्वच्छता आणि नागरिकांचे सहकार्य आवश्यक आहे. टाकाऊ वस्तूंच्या कलात्मक पुनर्वापरातून स्वच्छतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविता येतो. नागरिकांनीही सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे.
>
> - डॉ. प्रदीप ठेंगल, उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

माणमध्ये चौथ्या मजल्यावरून पडून तरुण कामगाराचा मृत्यू!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

बांधकाम साइटवर कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेली संरक्षक जाळी, सेफ्टी बेल्ट आणि हेल्मेट यांसारखी साधने उपलब्ध करून न देता कामाला लावल्याने चौथ्या मजल्यावरून पडून एका २३ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना माण येथील संत तुकारामनगर परिसरात घडली. याप्रकरणी बांधकाम साइटचा मालक आणि ठेकेदार अशा दोघांविरोधात हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



विशाल शिवदर्शन बिराजदार (पोलीस हवालदार हिंजवडी पोलीस ठाणे) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.

संतोष माणिक राठोड (वय ३८, बांधकाम व्यावसायिक, रा. स्वप्ननगरी कॉलनी, राजवाडेनगर, काळेवाडी, पुणे; बांधकाम साइट मालक) आणि अमोल दिलीप चव्हाण (वय ३९, बांधकाम व्यावसायिक, रा. साखरेवस्ती, हिंजवडी, पुणे; ठेकेदार) अशी आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास संत तुकारामनगर, माण येथील सर्व्हे क्रमांक ९/२ मधील बांधकाम साइटवर ही दुर्घटना घडली. संबंधित बांधकाम साइटवर कामगारांच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक जाळी लावण्यात आली नव्हती. तसेच कामगारांना सेफ्टी बेल्ट, हेल्मेट आणि इतर आवश्यक सुरक्षा साधने पुरविण्यात आली नव्हती. काम करताना कामगार खाली पडून त्याचा मृत्यू होऊ शकतो, याची जाणीव असतानाही साइट मालक संतोष राठोड आणि ठेकेदार अमोल चव्हाण यांनी सुरक्षेची योग्य व्यवस्था केली नसल्याचा आरोप आहे.

त्यांनी महेश रामराव राठोड (वय २३, रा. लोंढे वस्ती, डांगे चौक, पुणे) याला कामासाठी साइटवर बोलावले होते. चौथ्या मजल्यावर मालवाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या मिनी क्रेनला ट्रॉली लावत असताना त्याचा तोल जाऊन तो खाली पडला. या दुर्घटनेत गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप वांगणेकर करीत आहेत.

पार्किंग पॉलिसीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अभिषेक बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न

शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासह प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आज 'अ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एक महत्त्वाची संयुक्त बैठक पार पडली.



स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकित उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा सभापती प्रमोद कुटे, नगरसेवक उत्तम केंदळे, राजू मिसाळ, बापू घोलप, अमित गावडे, सुजाता कारंडे, तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी, दळणवळण विभाग, बीआरटीएस विभाग, वाहतूक विभाग आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरात पार्किंग पॉलिसीच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील वाहतूक व्यवस्था, पार्किंगच्या निर्माण झालेल्या समस्या, रस्त्यांवरील अडचणी तसेच नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्यांचा सखोल आढावा घेण्यात आला. या वाहतुकीच्या मुद्द्यासोबतच पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, स्वच्छता आणि इतर सर्व महत्त्वाच्या विभागांच्या कामकाजासंदर्भातही संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

नागरिकांकडून सातत्याने मांडण्यात येणाऱ्या समस्या, प्रलंबित कामे आणि आवश्यक उपाययोजनांबाबत प्रत्येक विभागाला योग्य त्या कठोर सूचना देण्यात आल्या असून, कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

> शहराचा सुनियोजित विकास साधणे आणि नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पार्किंग पॉलिसीची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मोठी मदत होईल. नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या समस्या, पाणीपुरवठा, स्वच्छता व इतर प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, असे स्पष्ट निर्देश सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. प्रलंबित कामे कोणतीही कुचराई न करता वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, जेणेकरून सर्वसामान्यांना त्याचा थेट फायदा होईल.
>
> **- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती.**

दुष्काळसदृश परिस्थितीत कृषी यांत्रिकीकरणाचा शेतकऱ्यांना आधार

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीचा वाढता खर्च, मजुरांची कमतरता आणि उपलब्ध साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर या पार्श्वभूमीवर कृषी यांत्रिकीकरण योजना शेतकऱ्यांसाठी आधार ठरत आहे. शेतीची कामे कमी वेळेत, कमी श्रमात आणि कमी खर्चात करण्यासाठी कृषी यंत्रसामग्री उपलब्ध करून देणाऱ्या या योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातील ५ हजार ७९५ शेतकऱ्यांना आतापर्यंत ६५ कोटी ११ लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. ही रक्कम थेट शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यांवर जमा करण्यात आली आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीत पिकांचे व्यवस्थापन, मशागत, पेरणी, फवारणी आणि काढणीची कामे वेळेत पूर्ण करणे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असते. अशा वेळी आधुनिक कृषी यंत्रांचा वापर उपयुक्त ठरत असून, कृषी यांत्रिकीकरणामुळे श्रम, वेळ आणि उत्पादन खर्चात बचत होण्यास मदत होत आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ८८९ शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, ३६४ शेतकऱ्यांना पॉवर टिलर, २ हजार ९०२ शेतकऱ्यांना कृषी यंत्र-अवजारे, ६०० शेतकऱ्यांना कृषी अवजारे बँक, १३ शेतकऱ्यांना किसान ड्रोन, तर २७ शेतकऱ्यांना कंबाईन हार्वेस्टरसाठी अनुदान देण्यात आले आहे.

ट्रॅक्टर आणि पॉवर टिलरच्या वापरामुळे शेतीची विविध कामे सुलभ होण्यासोबतच मजुरीवरील खर्च कमी होण्यास मदत होत आहे. पॉवर टिलरचा वापर उसाची बांधणी, फळबागांमध्ये भर लावणे, तणनियंत्रण आणि मशागतीसाठी केला जातो. तसेच ट्रॅक्टरचलित कल्टिव्हेटर, नांगर, ब्लोअर, ट्रॉली, चाफ कटर, ऊस पाचट व्यवस्थापन यंत्र, बेलर मशीन, शुगरकेन श्रेडर-कटर, पेंडी श्रेशर, फवारणी आणि पेरणी यंत्रांसाठीही अनुदान दिले जाते.

दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीची कामे वेळेत पूर्ण करण्याबरोबरच उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी आधुनिक कृषी यंत्रसामग्री महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी यांत्रिकीकरण योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.



६०० कृषी अवजारे बँकांना २४ कोटींचे अनुदान

कृषी अवजारे बँक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना १० ते २५ लाख रुपयांपर्यंतची ट्रॅक्टर व कृषी अवजारे खरेदी करता येतात. यासाठी ४ ते १० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येते. चालू वर्षात जिल्ह्यातील ६०० कृषी अवजारे बँकांना एकूण २४ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार आधुनिक कृषी यंत्रांचा वापर करण्याची सुविधा उपलब्ध होत आहे.

किसान ड्रोनद्वारे फवारणीला प्रोत्साहन

किसान ड्रोन योजनेंतर्गत १३ शेतकऱ्यांना ड्रोन खरेदीसाठी ५७ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. ड्रोनच्या माध्यमातून ऊस, अन्य पिके आणि फळबागांवर फवारणी करता येते. दुष्काळी परिस्थितीत पिकांवरील पाण्याचा ताण कमी करण्यासाठी युरिया व पोटॅशची फवारणी करण्यासाठीही ड्रोनचा उपयोग होतो. कंबाईन हार्वेस्टरच्या माध्यमातून गहू, हरभरा, सोयाबीन, मका आदी पिकांची काढणी कमी वेळेत करता येते.

Express
Media Enterprises

Professional Live set up with live drone available..

- Documentary
- Weddings
- Drone
- Motion Graphics
- Testimonials
- Tutorial videos
- Product Videos
- Animation
- Social Media Content
- Promotional Videos
- Real Estate
- Corporate
- Advertising
- Events



PUNE

Contact: 9657767000/9370493922/9664188046